माझी वसुंधरा अभियान-५.० राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये राबविण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग
शासन निर्णय, क्रमांक मावअ २०२४/ प्र.क्र. २४/ तां.क.१
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक
मंत्रालय, मुंबई ४०००३२
दिनांक : ६ सप्टेंबर, २०२४

वाचा : (१) शासन निर्णय, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग क्रमांक अभियान-२०२०/ प्र. क्र.१३४/ तां.क.१, दिनांक १४ ऑक्टोबर, २०२०
(२) शासन निर्णय, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग क्रमांक अभियान-२०२१/ प्र. क्र.१६/ तां.क.१, दिनांक २१ जानेवारी, २०२१
(३) शासन निर्णय, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग क्रमांक मावआ-२०२१/ प्र. क्र.७५/ तां.क.१, दिनांक २२ डिसेंबर, २०२१
(४) शासन निर्णय, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग क्रमांक मावआ-२०२२/ प्र. क्र.१०८/ तां.क.१, दिनांक ०७ नोव्हेंबर, २०२२
(५) शासन निर्णय, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग क्रमांक मावआ-२०२३/ प्र. क्र.८३/ तां.क.१, दिनांक २७ सप्टेंबर, २०२३

प्रस्तावना:

पर्यावरणातील वातावरणीय बदलाचे महत्व लक्षात घेता, पर्यावरण विभागाचा **"पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग"** असा नामबदल करण्यात आला आहे. निसर्गाशी असलेली कटिबद्धता निश्चित करण्यासाठी पृथ्वी, वायू, जल, अग्नी, आणि आकाश या निसर्गाशी संबंधित पंचतत्त्वावर पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग कार्य करीत आहे.

२. पर्यावरणाचे जतन, संवर्धन व संरक्षण करण्यासाठी **"माझी वसुंधरा (माय अर्थ)"** हा अभिनव उपक्रम विभागाने हाती घेतला आहे. जो निसर्गाच्या **"पंचमहाभूते"** नावाच्या पाचही घटकांवर लक्ष केंद्रित करतो. त्यात भूमी (जमीन), जल (पाणी), वायू (हवा), अग्नी (ऊर्जा), आकाश (संवर्धन) यांचा समावेश आहे. या उपक्रमातून वातावरणीय बदल आणि पर्यावरणाच्या समस्यांबद्दल नागरिकांना जागरूक करून पर्यावरणाच्या सुधारणेप्रती प्रयत्न करण्यात येतात.

३. **माझी वसुंधरा अभियान:**

३.१ पृथ्वी, वायू, जल, अग्नी, आणि आकाश या निसर्गाशी संबंधित पंचतत्वांवर आधारित **"माझी वसुंधरा अभियान"** राज्यामध्ये दिनांक २ ऑक्टोबर, २०२० पासून राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत नागरी स्थानिक स्वराज्य संस्था व ग्राम पंचायती या स्थानिक स्वराज्य संस्थांची पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन करणाऱ्या योजना प्रभावीपणे व मिशन मोड पध्दतीने राबविण्यासाठी स्पर्धा घेण्यात येते.

३.२ निसर्गाच्या पंचतत्वावर आधारित पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन करणाऱ्या विविध शासकीय योजना / कार्यक्रम / उपाय योजना एकत्रित करून त्या प्रभावीपणे व मिशन मोड पध्दतीने राबविण्यासाठी इंडिकेटर स्वरूपात असलेली टुलकिट तयार करून स्थानिक स्वराज्य

संस्थांना दिली जाते. ज्यामध्ये त्यांनी केलेल्या कामाचे मुल्यमापन करण्यासाठी गुण ठेवण्यात येतात. या टूलकिटनुसार विविध उपाययोजना स्थानिक संस्थांमध्ये एप्रिल ते मार्च या एक वर्षाच्या कालावधीत राबवावयाच्या आहेत.

३.३ माझी वसुंधरा अभियानात सहभागी सर्व स्थानिक संस्थांनी एप्रिल ते मार्च या कालावधीत माझी वसुंधरा अभियानांतर्गत केलेल्या कामाची माहिती एम.आय.एस. स्वरूपात माझी वसुंधरा अभियानाच्या वेब पोर्टलवर भरावयाची आहे. त्यानंतर, स्थानिक संस्थांनी भरलेल्या एम.आय.एस. चे डेस्कटॉप मुल्यमापन त्रयस्त यंत्रणेमार्फत करण्यात येते.

३.४ डेस्कटॉप मुल्यमापनात गुणानुक्रमे उच्चत्तम कामगिरी करणाऱ्या स्थानिक संस्थांचे क्षेत्रीय मुल्यमापन त्रयस्त यंत्रणे मार्फत संबंधित स्थानिक संस्थेमध्ये प्रत्यक्ष भेट देवून करण्यात येते.

३.५ डेस्कटॉप मुल्यमापन व क्षेत्रीय मुल्यमापन यामध्ये प्राप्त होणाऱ्या एकूण गुणांच्या आधारे उच्चत्तम कामगिरी करणाऱ्या स्थानिक संस्थांची विजेते म्हणून निवड करून या स्थानिक संस्थांचा सन्मान जागतीक पर्यावरण दिनी म्हणजे दिनांक ५ जून रोजी करण्यात येतो.

४. <u>माझी वसुंधरा अभियान १.०, २.०, ३.० व ४.० ची अंमलबजावणी:</u>

४.१ माझी वसुंधरा अभियान १.० या अभियानाच्या पहिल्या वर्षात (२०२०-२१) राज्यामधील ६८६ स्थानिक स्वराज्य संस्थांनी (अमृत शहरे ४३ , नगरपरिषदा २२२, नगरपंचायती १३० व ग्रामपंचायती २९१) सहभाग घेतला होता. माझी वसुंधरा अभियान १.० मध्ये (१) अमृत, (२) नगर परिषद, (३) नगर पंचायत, (४) ग्राम पंचायत असे ०४ गट ठेवण्यात आले होते. या अभियानात निसर्गाशी संबंधित पंचतत्वांवर स्थानिक स्वराज्य संस्थांनी केलेल्या कामांचे मुल्यमापन करण्यासाठी १,५०० गुण ठेवण्यात आले होते. या अभियानाचा कालावधी २ ऑक्टोबर, २०२० ते दिनांक ३१ मार्च २०२१ असा होता. या अभियानात सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या विजेत्यांचा सन्मान दिनांक ५ जून, २०२१ रोजी माझी वसुंधरा अभियान ऑनलाईन सन्मान सोहळ्यात करण्यात आला.

४.२ माझी वसुंधरा अभियान २.० मध्ये माझी वसुंधरा १.० पेक्षा ५ पट जास्त म्हणजेच एकूण ११,९६८ (४०६ नागरी, ११,५६२ ग्राम पंचायती) एवढ्या स्थानिक स्वराज्य संस्थांनी नोंदणी करून सहभाग घेतला होता. माझी वसुंधरा अभियान २.० मध्ये (१) अमृत, (२) नगर परिषद, (३) नगर पंचायत, (४) ग्राम पंचायत ०१ व (५) ग्राम पंचायत ०२ असे ०५ गट ठेवण्यात आले होते. या अभियानात निसर्गाशी संबंधित पंचतत्वांवर स्थानिक स्वराज्य संस्थांनी केलेल्या कामांचे मुल्यमापन करण्यासाठी अमृत गटासाठी ६,००० तर अमृत गट वगळून इतर गटासाठी ५,५०० गुण ठेवण्यात आले होते. हे अभियान दिनांक १६ एप्रिल २०२१ पासून ३१ मार्च २०२२ या कालावधी मध्ये राबविण्यात आले होते. या अभियानात विजेत्यांचा सन्मान दिनांक ५ जून, २०२२ रोजी आयोजित माझी वसुंधरा अभियान सन्मान सोहळ्यात करण्यात आला.

४.३ माझी वसुंधरा अभियान ३.० मध्ये एकूण १६,८२४ (माझी वसुंधरा २.० पेक्षा ४,८५६ ने अधिक) (४११ नागरी, १६,४१३ ग्राम पंचायती) स्थानिक स्वराज्य संस्थांनी सहभाग घेतला होता. माझी वसुंधरा अभियान ३.० मध्ये मोठया प्रमाणात स्थानिक संस्थांनी सहभाग घेतल्याने लोकसंखेच्या प्रमाणात एकूण ११ गट करण्यात आले होते. या अभियानात निसर्गाशी

संबंधित पंचतत्वांवर स्थानिक स्वराज्य संस्थांनी केलेल्या कामांचे मुल्यमापन करण्यासाठी अमृत गटासाठी ७,६०० तर, अमृत गट वगळून इतर गटासाठी ७,५०० गुण ठेवण्यात आले होते. माझी वसुंधरा अभियान ३.० चा कालावधी १ एप्रिल २०२२ ते ३१ मार्च २०२३ पर्यंत होता. या अभियानात विजेत्यांचा सन्मान दिनांक ५ जून, २०२३ रोजी आयोजित माझी वसुंधरा अभियान सन्मान सोहळ्यात करण्यात आला.

४.४ माझी वसुंधरा अभियान ४.० मध्ये एकूण २२,६३२ (माझी वसुंधरा ३.० पेक्षा ५८०८ ने अधिक) (४१४ नागरी, २२,२१८ ग्राम पंचायती) स्थानिक स्वराज्य संस्थांनी सहभाग घेतला होता. माझी वसुंधरा अभियान ४.० मध्ये मोठया प्रमाणात स्थानिक संस्थांनी सहभाग घेतल्याने लोकसंखेच्या प्रमाणात एकूण १२ गट करण्यात आले होते. या अभियानात निसर्गाशी संबंधित पंचतत्वांवर स्थानिक स्वराज्य संस्थांनी केलेल्या कामांचे मुल्यमापन करण्यासाठी अमृत गटासाठी ८,३०० , अमृत गट वगळून इतर नागरी संस्थांसाठी ८,१०० तर, ग्राम पंचायतींसाठी ८,२०० गुण ठेवण्यात आले होते. माझी वसुंधरा अभियान ४.० चा कालावधी १ एप्रिल २०२३ ते ३१ मार्च २०२४ असा होता. परंतु, लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणूकीमुळे हा कालावधी दिनांक ३१ मे, २०२४ पर्यंत वाढविण्यात आला होता.

५. माझी वसुंधरा अभियानांतर्गत स्थानिक संस्थांनी पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन करणाऱ्या विविध योजनांची मागील वर्षांमधील प्रभावीपणे अंमलबजावणी केल्यामुळे झालेली फलनिष्पती विचारात घेवून **"माझी वसुंधरा अभियान ५.०" ची** प्रारूप टूलकिट तयार करून ती सर्वसंबंधितांना पाठवून अभिप्राय मागविण्यात आले होते. यासंदर्भात प्राप्त झालेले अभिप्राय विचारात घेवून **"माझी वसुंधरा अभियान ५.०" ची** टूलकीट अंत्तीम करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय :</u>

प्रस्तावनेत नमूद केलेल्या बाबींचा विचार करून, पृथ्वी, वायू, जल, अग्नी, आणि आकाश या सर्वांशी संबंधित पंचतत्वांवर आधारित "**माझी वसुंधरा अभियान ५.०**" हे राज्यातील माझी वसुंधरा अभियानांतर्गत नोंदणी केलेल्या सर्व म्हणजे २८,३१७ स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये (नागरी स्थानिक स्वराज्य संस्था ४१८ व ग्राम पंचायती- २७,८९९) राबविण्यास शासन मान्यता देत आहे.

२. तसेच, "**माझी वसुंधरा अभियान ५.०**" करिता स्थानिक स्वराज्य संस्थांचे लोकसंख्या निहाय खालील प्रमाणे गट करून त्यानुसार स्पर्धेची अंमलबजावणी करण्यासही शासन मान्यता देत आहे.

अ.क्र.		**लोकसंख्या निहाय गट**	**समाविष्ट स्थानिक संस्थांची संख्या**
(अ)	**नागरी स्थानिक स्वराज्य संस्था : ४१८**		
(०१)	**अमृत शहरे (४३)**	**१० लक्ष पेक्षा अधिक लोकसंख्या**	**१०**
(०२)		**३ लक्ष पेक्षा अधिक परंतु १० लक्ष पेक्षा कमी लोकसंख्या**	**१७**
(०३)		**१ लक्ष पेक्षा अक्षिक परंतु ३ लक्ष पेक्षा कमी लोकसंख्या**	**१६**
(०४)	**नगरपरिषद व नगर पंचायत (३७५)**	**४० हजार पेक्षा अधिक परंतु १ लक्ष पेक्षा कमी लोकसंख्या**	**७६**
(०५)		**२५ हजार पेक्षा अधिक परंतु ४० हजार पेक्षा कमी लोकसंख्या**	**८७**
(०६)		**१५ हजार पेक्षा अधिक परंतु २५ हजार पेक्षा कमी लोकसंख्या**	**१००**
(०७)		**१५ हजार पेक्षा कमी लोकसंख्या**	**११२**

(ब)	**ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था : २७,८९९**		
(०८)	**ग्राम पंचायती**	**१० हजार पेक्षा अधिक लोकसंख्या**	**३४६**
(०९)		**५ हजार पेक्षा अधिक व १० हजार पेक्षा कमी लोकसंख्या**	**१,४००**
(१०)		**३ हजार पेक्षा अधिक व ५ हजार पेक्षा कमी लोकसंख्या**	**३,२६१**
(११)		**२ हजार पेक्षा अधिक व ३ हजार पेक्षा कमी लोकसंख्या**	**५,३३५**
(१२)		**१.५ हजार पेक्षा जास्त व २ हजार पेक्षा कमी लोकसंख्या**	**४,९४३**
(१३)		**१ हजार पेक्षा जास्त व १.५ हजार पेक्षा कमी लोकसंख्या**	**६,७८३**
(१४)		**१ हजार पेक्षा कमी लोकसंख्या**	**५,८३१**

३. माझी वसुंधरा अभियान ५.० अंतर्गत स्थानिक स्वराज्य संस्थांनी पृथ्वी, वायू, जल, अग्नी, आणि आकाश या निसर्गाशी संबंधित पंचतत्वांवर केलेल्या कामांचे मुल्यमापन करण्यासाठी विविध इंडिकेटर असलेली प्रारूप टूलकिट (नागरी व ग्रामीण साठी स्वतंत्र) स्थानिक स्वराज्य संस्थांच्या काही प्रतिनिधीशी व या क्षेत्रात काम करणाऱ्या काही स्वयंसेवी संस्थांशी चर्चा करून तयार करण्यात आली आहे. त्यानंतर सदर प्रारूप टूलकिट सर्व संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांना व इतरांना पाठवून त्यांच्याकडून अभिप्राय / हरकती / सूचना मागविण्यात आल्या होत्या. प्राप्त झालेले अभिप्राय / हरकती / सूचना विचारात घेवून तयार करण्यात आलेल्या **माझी वसुंधरा अभियान ५.० ची टूलकिट अंत्तिम करण्यास शासन मान्यता देत आहे.** माझी वसुंधरा अभियान ५.० च्या अंत्तिम टूलकिट नुसार गुणांचे सविस्तर वितरण व मुल्यांकन या बाबतची कार्यपध्दती दर्शविणारी **नागरी व ग्रामीण** स्थानिक स्वराज्य संस्थांसाठीची अंत्तीम टुलकिट अनुक्रमे ***परिशिष्ट-१ व परिशिष्ट-२*** **म्हणून *(इंग्रजी व मराठी)*** या शासन निर्णया सोबत **जोडली आहे.**

४. माझी वसुंधरा अभियान ५.० च्या अंत्तिम टूलकिट नुसार, स्थानिक स्वराज्य संस्थांनी पृथ्वी, वायू, जल, अग्नी, आणि आकाश या निसर्गाशी संबंधित पंचतत्वांवर केलेल्या कामांचे मुल्यमापन करण्यासाठी खाली दिलेल्या विगतवारीनुसार **अमृत गटासाठी १५,४०० व अमृत गट वगळून इतर नागरी संस्थांच्या गटांसाठी १४,९०० तर ग्राम पंचायतींसाठी १४,०००** गुण ठेवण्यास मान्यता देण्यात येत आहे:-

विषय / गुण	**भूमी / Earth**	**वायू / Air**	**जल / water**	**अग्नी / Energy**	**आकाश / Enhancement**	**माझी वसुंधरा ५.० चा एमआयएस दिनांक १ ते ५ एप्रिल मध्ये दाखल करण्यासाठी (Early Bird)**
नागरी स्थानिक संस्था (अमृत) (१५,४००)	४,९००	३,६००	१,८००	१,६००	३,३००	२००
नागरी स्थानिक संस्था (अमृत वगळून) (१४,९००)	४,९००	३,१००	१,८००	१,६००	३,३००	२००
ग्राम पंचायती (१४,०००)	४,६२५	२,२७५	१,९००	१,७००	३,३००	२००

५. माझी वसुंधरा अभियानांतर्गत नागरी व ग्रामीण स्थानिक संस्थांमध्ये राबवावयाच्या पंचतत्वांमधील उपरोक्त विविध इंडिकेटर अंतर्गत उपक्रमांचा विस्तृत तपशील व त्यासाठीच्या गुणांचे सविस्तर वितरण खालील तक्त्यात नमूद केले आहे. तर, मुल्यांकना बाबतची सविस्तर कार्यपध्दती टूलकिट मध्ये देण्यात आली आहे.

अ.क्र.	**निर्देशक (अभियान काळातील कार्यवाहीसाठीच्या बाबी)**	**गुण**	
		नागरी	**ग्रामीण**
१	**भूमी**		
	हरित आच्छादन आणि जैवाविविधता		
(१)	माझी वसुंधरा अभियानादरम्यान लावलेली आणि जगलेली एकूण झाडे	६००	६००
(२)	जिओ-टॅगिंगसह वृक्षगणना - तयारी आणि प्रकाशन	१२५	१२५
(३)	महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, १९७५ ची अंमलबजावणी	१५०	--
(४)	रोपवाटिकांची निर्मिती	१००	१००
(५)	नवीन हरित क्षेत्रांचा विकास व देखभाल	३००	३००
(६)	वृक्ष योजना : किमान ३३% हरित आच्छादन प्राप्त करण्यासाठीची योजना	२२५	--
(७)	लोकजैवविविधता नोंदवही (PBR): तयारी आणि दस्तावैजीकरण तयार करणे.	१५०	१५०
(८)	मातीच्या माध्यमातून कार्बन सिंक करणे.	१५०	१५०
(९)	बांबू / खस / शेवगा लागवड	१५००	१५००
(१०)	बीज संकलन केंद्र	१५०	१५०
(११)	शाश्वत शेती	--	२००
	हरित आच्छादन आणि जैवाविविधता-एकूण	**३,४५०**	**३,२७५**
	घनकचरा व्यवस्थापन		
(१)	घनकचरा व्यवस्थापन: निर्मितीच्या ठिकाणी विलगीकरण आणि संकलन	३००	२००
(२)	ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया	२००	२००
(३)	सुक्या कचऱ्यावर प्रक्रिया/विल्हेवाट	२५०	२००
(४)	जुन्या साठलेल्या कचऱ्यावर (Legacy Waste) शास्त्रोक्त प्रक्रिया	१००	१००
(५)	प्लास्टिक कचरा व्यवस्थापन (सिंगल यूज प्लास्टिकवर (SUP) बंदी)	३००	३००

अ.क्र.	निर्देशक (अभियान काळातील कार्यवाहीसाठीच्या बाबी)	गुण	
		नागरी	ग्रामीण
(६)	जैव-वैद्यकीय (बायो-मेडिकल) कचरा व्यवस्थापन	१००	१००
(७)	ई-कचरा व्यवस्थापन	१००	१५०
(८)	हागणदारीमुक्तीचा (ओडीएफ) दर्जा	१००	१००
	घनकचरा व्यवस्थापन-एकूण	**१४५०**	**१३५०**
	भूमी-एकूण	**४,९००**	**४,६२५**
२.	**वायू**		
(१)	वायु गुणवत्ता परिक्षण - पर्यावरण, वने आणि वातावरणीय बदल मंत्रालय (MoEF&CC) किंवा NABL मान्यताप्राप्त प्रयोगशाळेद्वारे	५००	२००
	वायू प्रदूषण कमी करणे		
(२)	फटाक्यांवर बंदी घालण्याकरिता पुढाकार	१७५	१७५
(३)	नागरिकांमध्ये चांगल्या सवर्यींना प्रोत्साहन- सायकलिंग ट्रॅकची निर्मिती आणि पादचारी मार्ग / कृषी कचरा व्यवस्थापन	१२५	३००
(४)	बांधकाम व पाडकाम कचऱ्याचे व्यवस्थापन / गॅस कनेक्शन	३००	२००
	इलेक्ट्रिक वाहन धोरणाची प्रभावी अंमलबजावणी		
(५)	इलेक्ट्रिक वाहन (EV) धोरण : इलेक्ट्रिक वाहनांची संख्या	९००	५००
(६)	इलेक्ट्रिक वाहन चार्जिंग स्टेशनची संख्या	५००	३००
(७)	ध्वनी प्रदूषण कमी करणे	१५०	१५०
(८)	वातावरणीय बदल (Climate Change) - जनजागृती	२५०	२५०
(९)	आपत्ती व्यवस्थापनाची तयारी	२००	२००
(१०)	वातावरणीय कृती नियोजन (फक्त अमृत गटासाठी)	५००	--
	वायू-एकूण अमृत गटासाठी	**३,६००**	
	वायू-एकूण (अमृत गट वगळून इतर गटांसाठी)	**३,१००**	**२,२७५**
३.	**जल**		
(१)	जल संसाधन संवर्धन आणि पुनरुज्जीवन	३००	४५०
	जल संवर्धन		

अ.क्र.	निर्देशक (अभियान काळातील कार्यवाहीसाठीच्या बाबी)	गुण	
		नागरी	ग्रामीण
(२)	सार्वजनिक इमारतींवर पावसाच्या पाण्याचे संधारण (रेन वॉटर हार्वेस्टिंग)	२५०	२००
(३)	पावसाचे पाणी झिरपणारे पाझरखड्डे (रेन वॉटर परकोलेशन पिट)	१००	१००
(४)	भूजल पूनर्भरण (विहिरी / विंधन विहिरी)	२५०	२५०
	पाण्याचे नुकसान मोजणे आणि गुणवत्तेचे निरीक्षण करणे		
(५)	सार्वजनिक इमारतींचे जल लेखापरीक्षण / जल अंदाजपत्रक आणि लेखापरीक्षण (वॉटर ऑडिट)	१५०	१५०
(६)	पाणी पुरवठा यंत्रणेचे जल लेखापरीक्षण	१५०	--
(७)	जल गुणवत्ता निरीक्षण	१००	--
(८)	सांडपाण्यावर प्रक्रिया व प्रक्रिया केलेल्या पाण्याचा पुनर्वापर / जल कार्यक्षम शेती	२००	१००
(९)	पाणीपुरवठा व्यवस्थापन	--	१५०
(१०)	सांडपण्याचे नियोजन	--	१००
(११)	शाश्वत सणांचा प्रचार	२००	२००
(१२)	पाणथळ जागांचे संवर्धन	१००	१००
(१३)	पंचायत विकास निर्देशांक	-	१००
	जल-एकूण	**१,८००**	**१,९००**
४.	**अग्नी**		
(१)	नुतनीकरणयोग्य ऊर्जा स्त्रोत आणि निव्वळ शून्य कार्बन उसर्जनाबाबत प्रसार व प्रचार	३००	३००
	कार्बन उत्सर्जन कमी असलेल्या उर्जा स्त्रोतांचा अवलंब		
(२)	हरित पथदिवे	२००	२००
(३)	स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये अक्षय ऊर्जा प्रकल्प बसवणे	५००	५००
(४)	हरीत इमारती / अक्षय ऊर्जेचे स्त्रोत म्हणून बायोगॅस संयंत्रे	३००	३००
(५)	सार्वजनिक इमारतींचे ऊर्जा लेखापरीक्षण / सोलार (सौर) पंप	२००	२००
(६)	कूल रूफिंग / विकेंद्रीत सौर ऊर्जा संयंत्रे	१००	२००
	अग्नी -एकूण	**१,६००**	**१,७००**

अ.क्र.	निर्देशक (अभियान काळातील कार्यवाहीसाठीच्या बाबी)	गुण	
		नागरी	ग्रामीण
५.	**आकाश**		
	सुधारणा		
(१)	ई-प्लेज (#Epledge) नोंदणी आणि पूर्तता	६००	६००
(२)	समाज माध्यमाचा वापर करून माझी वसुंधरा अभियानाची जनजागृती करणे	५००	५००
(३)	स्पर्धा आणि जनजागृती उपक्रमांद्वारे माझी वसुंधरा अभियानाची जनजागृती करणे	४००	४००
(४)	तरुणांचा सहभाग आणि पर्यावरण दूतांची निवड	३००	३००
(५)	सार्वजनिक ठिकाणी माझी वसुंधरा तत्त्वे दर्शवणाऱ्या बाबींच्या माध्यमातून प्रचार आणि प्रसिध्दी	८००	८००
(६)	बचत गटांचा सहभाग	१००	१००
(७)	पर्यायी निधी मिळवण्याचे मार्ग : सीएसआर, सामुदायिक सहभाग व इतर	२००	२००
	शिक्षण		
(८)	महाराष्ट्र युथ फॉर क्लायमेट ॲक्शन (MYCA) उपक्रमाद्वारे वातावरणीय बादलांबाबत तरुणांमध्ये जागरूकता	२००	२००
(९)	पर्यावरण सेवा योजनेत शाळांचा सहभाग	२००	२००
	आकाश- एकूण	**३,३००**	**३,३००**
भूमी, वायू, जल, अग्नी, आकाश एकूण (अमृत गटाकरिता)		**१५,२००**	
भूमी, वायू, जल, अग्नी, आकाश एकूण (अमृत गट वगळता इतर नागरी स्थानिक संस्थांसाठी)		**१४,७००**	
भूमी, वायू, जल, अग्नी, आकाश एकूण ग्रामपंचायती करिता			**१३,८००**
दिनांक १ ते ५ एप्रिल, २०२५ या कालावधीत MIS सादर केल्यास अर्ली बर्डचे गुण		**२००**	**२००**
भूमी, वायू, जल, अग्नी, आकाश व अर्ली बर्ड मिळून एकूण (अमृत गटाकरिता)		**१५,४००**	-
भूमी, वायू, जल, अग्नी, आकाश व अर्ली बर्ड मिळून एकूण (अमृत गट वगळता इतर नागरी स्थानिक संस्थांसाठी)		**१४,९००**	-

अ.क्र.	निर्देशक (अभियान काळातील कार्यवाहीसाठीच्या बाबी)	गुण	
		नागरी	ग्रामीण
भूमी, वायू, जल, अग्नी, आकाश व अर्ली बर्ड मिळून एकूण ग्रामपंचायती करिता		-	**१४,०००**

६. **स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये सदर अभियान प्रभावीपणे राबविण्याची जबाबदारी संबंधित आयुक्त, महानगरपालिका, मुख्याधिकारी, नगरपरिषद/ नगरपंचायत व ग्रामसेवक / ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत यांची राहील. तर, जिल्हयाच्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्रमुख म्हणून संबंधित जिल्हयाचे जिल्हाधिकारी, जिल्हयाच्या ग्रामीण संस्थांचे प्रमुख म्हणून संबंधित जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी व संबंधित महसूली विभागाचे प्रमुख म्हणून विभागीय आयुक्त यांनी त्यांचे विभागातील / जिल्हयातील स्थानिक संस्थांना प्रोत्साहन देवून त्यांच्याकडून सदर अभियानात उच्चत्तम कामगिरी करून घेण्याची जबाबदारी सोपविण्यात येत आहे.**

७. सदर अभियानाचा कालावधी दिनांक १ जून, २०२४ ते दिनांक ३१ मार्च, २०२५ असा राहिल. या अभियानांतर्गत स्थानिक स्वराज्य संस्थांनी केलेल्या कामाचे डेस्कटॉप मुल्यमापन दिनांक ६ एप्रिल, २०२५ ते दिनांक ३१ एप्रिल, २०२५ या कालावधीत करण्यात येईल व डेस्कटॉप मुल्यमापनात यशस्वी ठरलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांचे फिल्ड असेसेमेंट दिनांक २ मे, २०२५ ते २५ मे, २०२५ या कालावधीत त्रयस्त यंत्रणां मार्फत करण्यात येईल व त्याचा निकाल जागतिक पर्यावरण दिनी म्हणजे दिनांक ५ जून, २०२५ रोजी जाहिर करून बक्षिस वितरण करण्याचे प्रस्तावित आहे.

८. माझी वसुंधरा अभियान ५.० अंतर्गत स्थानिक स्वराज्य संस्थांना पुढे दर्शविल्या प्रमाणे बक्षिसे देण्यात येतील:

<u>राज्यस्तर (State level):</u>

(अ) **स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी** :

अ.क्र.		लोकसंख्या निहाय गट	गटामधील गुणानुक्रमानुसार	भूमी या थीमॅटिक क्षेत्रात सर्वोत्तम कामगिरी	उंच उडी (High Jump)	बांबू लागवड पुरस्कार
(अ)	**नागरी स्थानिक स्वराज्य संस्था : ४१८**					
(०१)	अमृत शहरे (४३)	१० लक्ष पेक्षा अधिक लोकसंख्या : १०	३ शहरे	१	०	१
(०२)		३ लक्ष पेक्षा अधिक परंतु १० लक्ष पेक्षा कमी लोकसंख्या : १७	३ शहरे	१	०	१
(०३)		१ लक्ष पेक्षा अक्षिक परंतु ३ लक्ष पेक्षा कमी लोकसंख्या: १६	३ शहरे	१	०	१

अ.क्र.		लोकसंख्या निहाय गट	गटामधील गुणानुक्रमानुसार	भूमी या थीमॅटिक क्षेत्रात सर्वोत्तम कामगिरी	उंच उडी (High Jump)	बांबू लागवड पुरस्कार
(०४)	नगरपरिषद व नगर पंचायत (३७५)	४० हजार पेक्षा अधिक परंतु १लक्ष पेक्षा कमी लोकसंख्या : ७६	३ शहरे	१	१	१
(०५)		२५ हजार पेक्षा अधिक परंतु ४० हजार पेक्षा कमी लोकसंख्या : ८७	३ शहरे	१	१	१
(०६)		१५ हजार पेक्षा अधिक परंतु २५ हजार पेक्षा कमी लोकसंख्या : १००	३ शहरे	१	१	१
(०७)		१५ हजार पेक्षा कमी लोकसंख्या : ११२	३ शहरे	१	१	१
(ब)	**ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था : २७,८९९ ग्राम पंचायती**					
(०८)	ग्राम पंचायती	१० हजार पेक्षा अधिक लोकसंख्या: ३४६	३ ग्राम पंचायती	१	१	१
(०९)		५ हजार पेक्षा अधिक व १० हजार पेक्षा कमी लोकसंख्या: १,४००	३ ग्राम पंचायती	१	१	१
(१०)		३ हजार पेक्षा अधिक व ५ हजार पेक्षा कमी लोकसंख्या: ३,२६१	३ ग्राम पंचायती	१	१	१
(११)		२ हजार पेक्षा अधिक व ३ हजार पेक्षा कमी लोकसंख्या: ५,३३५	३ ग्राम पंचायती	१	१	१
(१२)		१.५ हजार पेक्षा जास्त व २ हजार पेक्षा कमी लोकसंख्या : ४,९४३	३ ग्राम पंचायती	१	१	१
(१३)		१ हजार पेक्षा जास्त व १.५ हजार पेक्षा कमी लोकसंख्या: ६,७८३	३ ग्राम पंचायती	१	१	१
(१४)		१ हजार पेक्षा कमी लोकसंख्या: ५,८३१	३ ग्राम पंचायती	१	१	१

(ब) विभागीय व जिल्हास्तरावरील अधिकाऱ्यांसाठी:

(१)	सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या विभागाचे विभागीय आयुक्त	३
(२)	राज्यात सर्वोत्तम कामगिरी करणारे जिल्हाधिकारी	३
(३)	राज्यात सर्वोत्तम कामगिरी करणारे मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.	३
(४)	राज्यात सर्वोत्तम कामगिरी करणारे गट विकास अधिकारी	३

<u>विभागीयस्तर (Division Level):</u>

स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी: (राज्यस्तरावरील विजेते वगळून)

अ.क्र.	गट	लोकसंख्या निहाय गट	विभागस्तरीय सर्वोत्तम कामगिरी – प्रत्येक विभागासाठी
(अ)	**नागरी स्थानिक स्वराज्य संस्था : ४१८**		
(०१)	अमृत शहरे (४३)	१० लक्ष पेक्षा अधिक लोकसंख्या : १०	संपूर्ण अमृत गटासाठी १
(०२)		३ लक्ष पेक्षा अधिक परंतु १० लक्ष पेक्षा कमी लोकसंख्या : १७	
(०३)		१ लक्ष पेक्षा अक्षिक परंतु ३ लक्ष पेक्षा कमी लोकसंख्या : १६	
(०४)	नगरपरिषद व नगर पंचायत (३७५)	४० हजार पेक्षा अधिक परंतु १ लक्ष पेक्षा कमी लोकसंख्या : ७६	१
(०५)		२५ हजार पेक्षा अधिक परंतु ४० हजार पेक्षा कमी लोकसंख्या : ८७	१
(०६)		१५ हजार पेक्षा अधिक परंतु २५ हजार पेक्षा कमी लोकसंख्या : १००	१
(०७)		१५ हजार पेक्षा कमी लोकसंख्या : ११२	१
(ब)	**ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था : २७,८९९**		
(०८)	ग्राम पंचायती	१० हजार पेक्षा अधिक लोकसंख्या: ३४६	१
(०९)		५ हजार पेक्षा अधिक व १० हजार पेक्षा कमी लोकसंख्या : १,४००	१
(१०)		३ हजार पेक्षा अधिक व ५ हजार पेक्षा कमी लोकसंख्या: ३,२६१	१
(११)		२ हजार पेक्षा अधिक व ३ हजार पेक्षा कमी लोकसंख्या : ५,३३५	१
(१२)		१.५ हजार पेक्षा जास्त व २ हजार पेक्षा कमी लोकसंख्या : ४,९४३	१
(१३)		१ हजार पेक्षा जास्त व १.५ हजार पेक्षा कमी लोकसंख्या : ६,७८३	१
(१४)		१ हजार पेक्षा कमी लोकसंख्या : ५,८३१	१

(ब) विभागीय व जिल्हास्तरावरील अधिकाऱ्यांसाठी: (राज्यस्तरावरील विजेते वगळून)

(१)	विभागात सर्वोत्तम कामगिरी करणारे जिल्हाधिकारी (प्रत्येक विभागातून दोन) ६ X २	१२
(२)	विभागात सर्वोत्तम कामगिरी करणारे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (प्रत्येक विभागातून दोन) ६ X २	१२
(३)	विभागात सर्वोत्तम कामगिरी करणारे गट विकास अधिकारी, (प्रत्येक विभागातून तीन) ६ X ३	१८
(४)	जिल्हयामध्ये सर्वोत्तम कामगिरी करणारे गट विकास अधिकारी, (प्रत्येक जिल्हयातून एक) ३५ X १	३५

९. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२४०९०६१६१२५६६९०४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SURYAKANT KISAN NIKAM

Digitally signed by SURYAKANT KISAN NIKAM
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=ENVIRONMENT AND CLIMATE CHANGE DEPARTMENT, 2.5.4.20=3978ce8e745a91e05616f9473df7e92873ee7ac8c2f7c49ac520e61061ddde0d, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=3A94A1F658A34D45CA2859DBC88DFB4076007988946087EF0FB88C7CD7314C27, cn=SURYAKANT KISAN NIKAM
Date: 2024.09.06 16:14:22 +05'30'

(सु.कि.निकम)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति :

१) मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
२) मा. उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
३) मा. उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
४) मा. मंत्री, ग्राम विकास, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
६) अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई
७) अपर मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग विभाग, मुंबई
८) प्रधान सचिव, (नवि-२) नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
९) प्रधान सचिव, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१०) अध्यक्ष, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, मुंबई
११) विभागीय आयुक्त (सर्व)
१२) आयुक्त, तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई
१३) जिल्हाधिकारी (सर्व)
१४) आयुक्त, सर्व महानगरपालिका
१५) सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, मुंबई
१६) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
१७) राज्य अभियान संचालक, स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) मुंबई
१८) सह आयुक्त / उप आयुक्त, नगरपालिका शाखा, विभागीय आयुक्त कार्यालय (सर्व)
१९) सह आयुक्त / उप आयुक्त, नगरपालिका शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय (सर्व)
२०) गट विकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व)
२१) मुख्याधिकारी, नगरपरिषदा / नगरपंचायती (सर्व)
२२) ग्रामसेवक, ग्रामपंचायत (सर्व)
२३) निवडनस्ती,

LiFE
Lifestyle for Environment

सत्यमेव जयते

Majhi Vasundhara

महाराष्ट्र शासन

पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग

माझी वसुंधरा अभियान ५.०

टूलकिट (नागरी)
२०२४-२०२५



परिशिष्ट-१

माझी वसुंधरा अभियान ५.०
पर्यावरण व वातावरणीय विभाग
टूलकीट, २०२४ मध्ये प्रकाशित
भेट द्या: https://majhivasundhara.in/en

अनुक्रमणिका

- माझी वसुंधरा अभियान ४
- शाश्वत विकास उद्दिष्टे ५
- वेळापत्रक ६
- माहिती संकलन कार्यपद्धती ७
- महत्त्वाचे मुद्दे ८
- प्राथमिक माहिती संकलन १०
- मार्गदर्शक सूचना ११
- थीमॅटिक क्षेत्रे १९
- निर्देशक २१
- संदर्भासाठी योजना व अधिनियम २६१
- पुरस्कार २७०

माझी वसुंधरा अभियान

महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभागामार्फत नागरी आणि ग्रामीण क्षेत्रांसाठी राबविण्यात येणारा अनोखा एकात्मिक असा उपक्रम आहे. यामध्ये नैसर्गिक परिसंस्थांचे जतन व संरक्षण करण्यासाठीच्या विविध उपायांची अंमलबजावणी करणे आणि वातावरणीय बदलाच्या अनुषंगाने राबविण्यात येणाऱ्या पर्यावरणपूरक कृती उपक्रमांवर नागरिकांच्या सहभागास प्रोत्साहित करणे, या बाबी समाविष्ट केल्या आहेत.

या अभियानाची रचना **कार्बन पृथक्करण, हरित वायूचे उत्सर्जन कमी करणे आणि नागरिकांमध्ये शाश्वत जीवनशैलीचा प्रचार करणे** या वातावरणीय बदलाच्या तीन महत्त्वाच्या बाबींवर लक्ष केंद्रित करण्यासाठी करण्यात आली आहे.

अधिक माहितीसाठी भेट द्या: https://majhivasundhara.in

शाश्वत विकास उद्दिष्टे

- शाश्वत विकास उद्दिष्टे (SDGs), ज्यांना जागतिक उद्दिष्टे म्हणूनही ओळखले जाते, २०१५ मध्ये संयुक्त राष्ट्रांनी गरिबी समाप्त करण्यासाठी, आणि आपल्या पृथ्वीचे संरक्षण करण्यासाठी सार्वत्रिक आवाहन म्हणून स्वीकारले होते.
- ही उद्दिष्ट्ये जनसमुदायाच्या आणि पृथ्वीच्या शांतता आणि समृद्धीसाठी सामायिक योजना प्रदान करतात.
- ही १७ शाश्वत विकास उद्दिष्टे एकात्मिक आहेत म्हणजेच एका क्षेत्रातील कृतीचा इतर क्षेत्रांवर परिणाम होतो हे जाणून सर्वांगीण विकासाने सामाजिक, आर्थिक आणि पर्यावरणीय शाश्वतता संतुलन साधले पाहिजे.

शाश्वत विकास उद्दिष्टे आणि माझी वसुंधरा अभियान

- माझी वसुंधरा अभियान संयुक्त राष्ट्रांच्या शाश्वत विकास उद्दिष्टांशी सरेखित आहे कारण दोन्ही सर्वांगीण सामाजिक विकासाला संबोधित करतात.
- माझी वसुंधरा अभियान निसर्गाच्या पाचही घटकांवर (पंचमहाभूते) लक्ष केंद्रित करते – भूमी, वायू, जल, अग्नी आणि आकाश.
- निसर्गाच्या पाच घटकांना संबोधित करून आणि नागरिकांच्या सहभागाला प्रोत्साहन देऊन, माझी वसुंधरा अभियान शाश्वत विकास उद्दिष्टे साध्य करण्यासाठी योगदान देते.



वेळापत्रक -

माझी वसुंधरा अभियान ५.०



पुरस्कार वितरण
५ जून २०२५

क्षेत्रीय तपासणी
२ मे – २० मे २०२५

डेस्कटॉप मूल्यमापन
६ एप्रिल –२५ एप्रिल २०२५

MIS सबमिशन
१ एप्रिल – १५ एप्रिल २०२५


स्थानिक स्वराज्य संस्थांची नोंदणी
२६ जून – १५ ऑगस्ट २०२४

अभियान कालावधी
१ जून २०२४ - ३१ मार्च २०२५

माहिती संकलन कार्यपद्धती

- माझी वसुंधरा अभियान ४.० मध्ये सहभागी झालेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांचा माझी वसुंधरा अभियान ५.० मध्ये थेट समावेश होईल.
- स्थानिक स्वराज्य संस्थांनी माझी वसुंधरा अभियान ५ .० मध्ये सहभागी होण्यासाठी अभियानाच्या MIS पोर्टलवर नोंदणी करावी. अधिक माहितीसाठी https://abhiyanmis.majhivasundhara.in/ या संकेतस्थळाला भेट द्या.
- स्थानिक स्वराज्य संस्थांनी अभियान कालावधीत विविध उपक्रम राबवावेत आणि सदर उपक्रमांची माहिती MIS पोर्टलवर सादर करण्यासाठी आवश्यक तो सर्व तपशील तयार ठेवावा.
- स्थानिक स्वराज्य संस्थांनी टूलकिटमध्ये नमूद केल्याप्रमाणे MIS मध्ये त्यांची प्रगती आणि कामाचा अहवाल सादर करावा.
- माझी वसुंधरा अभियानाच्या MIS पोर्टलवर विहित स्वरूपात MIS सादर करावा.
- माझी वसुंधरा अभियान पोर्टलवरील माहिती अचूक, विश्वासार्ह आणि सत्य असल्याबाबतची जबाबदारी **स्थानिक स्वराज्य संस्थेच्या प्रशासकीय प्रमुखांची** असेल.

टीप: *स्थानिक स्वराज्य संस्थांनी सर्व कागदपत्रांच्या मूळ प्रती जतन कराव्यात. अभियान संचालनालयात, संबंधित कागदपत्रे पुन्हा सादर करावे लागू शकतात.*



महत्त्वाचे मुद्दे

- माझी वसुंधरा अभियान ५.० च्या कालावधीत म्हणजे, **दिनांक १ जून २०२४ ते दिनांक ३१ मार्च २०२५** या कालावधीत केलेल्या सर्व उपाययोजनांचा मूल्यमापनासाठी विचार केला जाईल.

- माझी वसुंधरा अभियान संचालनालयाने विहित केलेल्या नमुन्यामध्येच (फॉरमॅट/टेम्प्लेट्स) तपशील सादर करणे आवश्यक आहे. सदर नमुने MIS पोर्टलवर डाऊनलोड करण्यासाठी उपलब्ध असेल.

- कोणत्याही निर्देशकासाठी, जर सादर केलेले दस्तऐवज वैध/सुवाच्य नसतील आणि/किंवा गुगल लिंक्स अवैध असतील, तर त्यासाठी कोणतेही गुण दिले जाणार नाहीत.

- MIS वर नोंदवलेल्या माहितीच्या आधारे त्रयस्त यंत्रणेद्वारे डेस्कटॉप मूल्यमापन करण्यात येईल. त्यानंतर क्षेत्रीय तपासणी व मूल्यमापन (फील्ड मूल्यमापन) त्रयस्त यंत्रणेद्वारे करण्यात येईल.

माझी वसुंधरा अभियान ५.०

नागरी स्थानिक स्वराज्य संस्था (ULBs)-गट

अमृत शहरे (०१)	लोकसंख्या १० लक्षपेक्षा अधिक	१०
अमृत शहरे (०२)	लोकसंख्या ३ लक्ष ते १० लक्ष	१७
अमृत शहरे (०३)	लोकसंख्या १ लक्ष ते ३ लक्ष	१६
नगरपरिषद व नगर पंचायत (०४)	लोकसंख्या ४० हजार ते १ लक्ष	७६
नगरपरिषद व नगर पंचायत (०५)	लोकसंख्या २५ हजार ते ४० हजार	८७
नगरपरिषद व नगर पंचायत (०६)	लोकसंख्या १५ हजार ते २५ हजार	९८
नगरपरिषद व नगर पंचायत (०६)	लोकसंख्या १५ हजारपेक्षा कमी	११०
नागरी		४१४

टीप: सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्था आपल्या लोकसंख्येनुसार संबंधित गटात स्पर्धा करतील.
सदर लोकसंख्येचे गट २०११ च्या जनगणना अहवालानुसार तयार करण्यात आले आहेत.

प्राथमिक माहिती संकलन

नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांची माहिती

स्थानिक स्वराज्य संस्थेचे नाव आणि प्रकार
स्थानिक स्वराज्य संस्थेचे भौगोलिक क्षेत्रफळ
लोकसंख्या
शहरातील घरांची संख्या
प्रशासकीय प्रमुख यांचा तपशील (नाव, संपर्क क्रमांक)
समन्वय (नोडल) अधिकारी यांचा तपशील (नाव, पदनाम, संपर्क क्रमांक)
अधिकृत सोशल मिडिया पेज किंवा संकेतस्थळाची लिंक

टीप: *सदर लोकसंख्येचे गट २०११ च्या जनगणना अहवालानुसार तयार करण्यात आले आहेत.*

मार्गदर्शक सूचना

MIS साठी मार्गदर्शक सूचना

❖प्रत्येक निर्देशकासाठी MIS मध्ये माहिती भरणे आवश्यक आहे.

❖या टूलकिटमध्ये MIS मध्ये भरण्यासाठीची प्रत्येक निर्देशकासाठीची आवश्यक ती माहिती देण्यात आली आहे.

❖प्रत्येक निर्देशकासाठी सूचना आणि मार्गदर्शक सूचना देखील देण्यात आले आहेत.

❖स्थानिक स्वराज्य संस्थेने दिलेल्या नमुन्यानुसार आवश्यक दस्तऐवज जमा करून विहित माहिती संकलित करून ती जतन (सेव्ह) करून ठेवावी.

❖MIS सबमिशन दरम्यान आवश्यक असलेले तपशील **मूल्यमापन यंत्रणा क्रमांक (Evaluation Mechanism Number)** खाली दिलेल्या प्रमाणे प्रत्येक निर्देशकात समाविष्ट करण्यात आले आहेत.

टीप: MISमध्ये भरावयाची माहिती फक्त इंग्रजी भाषेत असावी.

मूल्यमापन कार्यपद्धती		गुण
१.	माझी वसुंधरा अभियान ५.० अंतर्गत लागवड केलेल्या व जगवलेल्या वृक्षांची एकूण संख्या **(Relative Marking)**	२००
२.	**स्थानिक वृक्ष:** माझी वसुंधरा अभियान ५.० दरम्यान लागवड केलेल्या आणि जगवलेल्या एकूण वृक्षांपैकी स्थानिक वृक्षांची टक्केवारी **(Relative Marking)**	२००

मूल्यमापन कार्यपद्धती क्रमांक	MIS साठी आवश्यक तपशील
१	माझी वसुंधरा अभियान ५.० दरम्यान लागवड केलेल्या एकूण झाडांची संख्या.
	माझी वसुंधरा अभियान ५.० दरम्यान जगवलेल्या एकूण झाडांची संख्या
२	माझी वसुंधरा अभियान ५.० दरम्यान लागवड केलेल्या एकूण स्थानिक झाडांची संख्या.
	माझी वसुंधरा अभियान ५.० दरम्यान जगवलेल्या एकूण स्थानिक झाडांची संख्या.

एक्सेल शीट्ससाठी मार्गदर्शक सूचना

- संदर्भित निर्देशकांसाठी एक्सेल शीटमध्ये माहिती भरणे आवश्यक आहे.
- स्थानिक स्वराज्य संस्थेने दिलेल्या नमुन्यानुसार आवश्यक दस्तऐवज जमा करून विहित माहिती संकलित करून ती जतन (सेव्ह) करून ठेवावी.

Sr.No	Address of the tree plantation done during Majhi Vasundhara Abhiyan 5.0 (Local Body should only enter alphanumerical values)	Google map location of the tree plantation (Local Body should enter valid google map link)	Date of Tree Plantation during Majhi Vasundhara Abhiyan 5.0 (Local Body should only enter date in DD-MM-YY format)	Total number of trees planted at the given location during Majhi Vasundhara Abhiyan 5.0 (Local Body should only enter whole numbers)	Total number of trees survived at the given location during Majhi Vasundhara Abhiyan 5.0 (Local Body should only enter whole numbers)
1	2	3	4	5	6

- संबंधित निर्देशकासाठी MIS मध्ये एक्सेल शीट्स जोडणे आवश्यक आहे. जर स्थानिक स्वराज्य संस्थेने एक्सेल शीटच्या डुप्लिकेशन/प्रतिकृती MIS मध्ये जोडल्यास संबंधित निर्देशकासाठी ० (शून्य) गुण देण्यात येतील.
- स्थानिक स्वराज्य संस्थांनी फक्त माझी वसुंधरा अभियान राज्य संचालनालयाने दिलेल्या विहित एक्सेल शीट्स वापराव्या. विहित एक्सेल शीटऐवजी इतर कोणतीही एक्सेल शीट वापरल्यास स्थानिक स्वराज्य संस्थेला ० (शून्य) गुण देण्यात येतील.
- MIS मध्ये भरलेली माहिती एक्सेल शीटमध्ये भरलेल्या महिती आणि MIS मधील संलग्न दस्तऐवजांसोबत तपासली जाईल . भरलेल्या माहितीमध्ये काही तफावत आढळून आल्यास स्थानिक स्वराज्य संस्थेला त्या निर्देशकासाठी ० (शून्य) गुण देण्यात येतील.
- काही निर्देशकांसाठी, एकापेक्षा जास्त एक्सेल शीट असू शकतात.

टीप: एक्सेलमध्ये भरावयाची माहिती फक्त इंग्रजी भाषेत असावी.

जिओटॅगिंगसाठी मार्गदर्शक सूचना

माझी वसुंधरा अभियान ५.० अंतर्गत छायाचित्रे जिओटॅग करण्यासाठीच्या सूचना:

- मोबाईलमध्ये प्ले स्टोअर उघडा, जिओटॅगिंग ॲप्स शोधा, सूचीमधून कोणतेही जिओ-टॅगिंग ॲप डाउनलोड करा आणि इंस्टॉल करा.
- जिओटॅगिंग ॲप उघडा आणि पूर्वी/दरम्यान/नंतरची छायाचित्रे घेताना एकाच ठिकाणाहून (angle) क्लिक करा.
- क्लिक केलेली जिओटॅग छायाचित्रे फोल्डरमध्ये सेव्ह करा.
- छायाचित्रे अपलोड करण्यापूर्वी त्यांची Size १ ते २ MB असल्याची खात्री करा.

भूमी थीमॅटीक क्षेत्रासाठी : प्रत्येक ठिकाणाची (वृक्षारोपण करण्यापूर्वी/दरम्यान/नंतर) विविध टप्प्यांवरील (आधी-दरम्यान-नंतर) जिओ-टॅग केलेली छायाचित्रे पीडीएफ (PDF) स्वरूपात एकत्र संकलित करून अपलोड करावीत.

सर्व जिओटॅग केलेल्या छायाचित्रांमध्ये खालील घटक असल्यानंतरच छायाचित्रे वैध मानले जातील:

- अक्षांश आणि रेखांश
- दिनांक (जेव्हा छायाचित्र काढण्यात आली.)
- ठिकाणाचे नाव

जिओटॅग छायाचित्रांसाठी मार्गदर्शक सूचना

छायाचित्रे वैध मानली जाण्यासाठी खालील तपशील जिओटॅग केलेल्या छायाचित्रांवर नमूद असणे आवश्यक आहे:

१. नागरी स्वराज्य संस्थेचे नाव

२. जिल्ह्याचे नाव

३. अक्षांश (Longitude) आणि रेखांश (Latitude)


४. दिनांक आणि वेळ








MIS मध्ये गुगल मॅप लिंक कशी टाकायची याविषयी मार्गदर्शक सूचना:





टप्पा १: तुमच्या संगणकामध्ये गूगल मॅप सुरू करा.



टप्पा २: तुम्ही शेअर करू इच्छित असलेल्या दिशानिर्देश, नकाशा किंवा मार्ग शोधा. यानंतर वर डावीकडे असलेल्या मेनू या पर्यायावर क्लिक करा.

टप्पा ३: शेअर किंवा एंबेड मॅप यावर क्लिक करा.





टप्पा ४: लिंक कॉपी करा आणि आवश्यक त्या ठिकाणी पेस्ट करा.

स्थानिक स्वराज्य संस्थांनी निर्देशकांमध्ये दिलेल्या गुगल मॅप लिंक डेस्कटॉप असेसरद्वारे तपासल्या जातील. फिल्ड मूल्यांकनासाठी, असेसरला समान लिंक दिली जाईल. त्यामुळे, स्थानिक स्वराज्य संस्थांनी अचूक गुगल मॅप लिंक पुरवावी.

IEC/प्रचारात्मक उपक्रमांच्या छायाचित्रांसाठी मार्गदर्शक सूचना

- जनजागृती उपक्रमांसाठी सादर केलेली सर्व छायाचित्रे ही उपक्रम ज्या तारखेला झाला त्या तारखेसह जिओटॅग केलेली असावीत.

- प्रत्येक उपक्रमासाठी, उपक्रमाची पार्श्वभूमी/बॅनर स्पष्टपणे दर्शवेल, असे किमान एक छायाचित्र काढणे आवश्यक आहे.

- बॅनरवर माझी वसुंधरा अभियान ५.० व MissionLife चे बोधचिन्ह (लोगो) व नाव असणे आवश्यक आहे.

- बॅनरवर कार्यक्रमाचे शीर्षक असावे. उदाहरणार्थ, जर वातावरणीय बदलाविषयी जनजागृती निर्माण करणारा उपक्रम असेल तर "वातावरणीय बदलाबाबत जागरूकता" असे स्पष्ट शीर्षक असावे.

- छायाचित्रात कार्यक्रमात सहभाग घेतलेल्या सहभागींचा समावेश असणे आवश्यक आहे.

- जनजागृती उपक्रमांमध्ये वातावरणीय बदलाची मूलभूत व्याख्या, संकल्पना, शासकीय नियम आणि धोरण आणि त्या विषय/निर्देशकासंबंधी राष्ट्रीय - आंतरराष्ट्रीय परिस्थिती या मुद्यांचा समावेश असावा.

- #majhivasundhara आणि #MissionLiFE हे हॅशटॅग वापरुन समाज माध्यमवर उपक्रम व कार्यक्रमांच्या पोस्ट कराव्या.

थीमॅटिक क्षेत्र


आकाश
अग्नि
जल
वायू
भूमी
वसुधरा



भूमी

एकूण गुण: ४,९००

१. भूमी (नागरी)- ४,९००

१.१ हरित आच्छादन आणि जैवविविधता	३,४५०
१.२ घनकचरा व्यवस्थापन	१,४५०

१.१ हरित आच्छादन आणि जैवविविधता

अ.क्र.	कृती बिंदू	गुण
१.१.१	माझी वसुंधरा अभियानादरम्यान लावलेली आणि जगवलेली एकूण झाडे	६००
१.१.२	जिओटॅगिंगसह वृक्षगणना- तयारी आणि प्रकाशन	१२५
१.१.३	महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, १९७५ ची अंमलबजावणी	१५०
१.१.४	रोपवाटिकेची निर्मिती	१००
१.१.५	नवीन हरित क्षेत्रांचा विकास व देखभाल	३००
१.१.६	वृक्ष योजना: किमान ३३% हरित आच्छादन प्राप्त करण्यासाठीची योजना	२२५
१.१.७	लोकजैवविविधता नोंदवही (PBR) तयारी आणि दस्तऐवजीकरण	१५०
१.१.८	मातीच्या माध्यमातून कार्बन सिंक करणे	१५०
१.१.९	बांबू/ खस/शेवगा लागवड	१,५००
१.१.१०	बीज संकलन केंद्र	१५०
एकूण		**३,४५०**

१.१.१ माझी वसुंधरा अभियानादरम्यान लावलेली आणि जगवलेली एकूण झाडे — गुण ६००

वृक्षारोपण हे आपल्या पृथ्वीचे आणि परिसंस्थेचे रक्षण करण्यासाठीचे एक आवश्यक पाऊल आहे. झाडे हवेतील कार्बन डायऑक्साइड शोषून, झाडे आणि मातीमध्ये कार्बन साठवून, वातावरणात ऑक्सिजन सोडून वातावरणीय बदल रोखण्यास मदत करतात. सदर निर्देशकाद्वारे स्थानिक स्वराज्य संस्थांनी वृक्षारोपण मोहीमा हाती घेतल्या होत्या की नाही आणि त्यांनी लावलेल्या एकूण झाडांपैकी (स्थानिक झाडांसह) किती झाडे जगवली आणि त्यांची काळजी घेतली का हे तपासले जाते.

	मूल्यमापन कार्यपद्धती	गुण
१.	माझी वसुंधरा अभियान ५.० अंतर्गत लागवड केलेल्या व जगवलेल्या वृक्षांची एकूण संख्या **(Relative Marking)**	२००
२.	**स्थानिक वृक्ष:** माझी वसुंधरा अभियान ५.० दरम्यान लागवड केलेल्या आणि जगवलेल्या एकूण वृक्षांपैकी स्थानिक वृक्षांची टक्केवारी **(Relative Marking)**	२००
३.	**अपकीप (Upkeep):** माझी वसुंधरा अभियान १.०, २.०, ३.० आणि ४.० दरम्यान लावलेले आणि जगवलेले वृक्ष **(Relative Marking)**	२००

आवश्यक तपशील:

- लागवड केलेल्या आणि जगवलेल्या वृक्षांची एकूण संख्या (स्थानिक प्रजातींच्या वृक्षांसह).
- लावलेल्या आणि जगवलेल्या स्थानिक वृक्षांची संख्या.
- स्थानाचे तपशील: संपूर्ण पत्ता, प्रकल्पाचे गुगल मॅपवरील स्थान इत्यादी माहिती विहित केलेल्या एक्सेलमध्ये.
- भूखंडांवर वृक्षारोपण: विकसित केलेली एकूण हरित क्षेत्रे चौरस मीटर (चौ. मी.) मध्ये.
- रस्त्याच्या कडेला वृक्षारोपण: रस्त्याच्या कडेला करण्यात आलेल्या वृक्षारोपणाची एकूण लांबी (मीटर मध्ये).
- वृक्षारोपण उपक्रमांचे कार्यारंभ आदेश आणि कार्य पूर्णत्वाचे प्रमाणपत्र.
- वृक्षारोपण उपक्रमाची आर्थिक माहिती: अंतिम पावत्यांसह सर्व देयके. जर, वृक्षारोपण व्यावसायिक सामाजिक जबाबदारी (CSR) च्या माध्यमातून झाले असेल तर त्याची पोचपावती सादर करावी.
- पुढील १-२ वर्षांसाठी आवश्यक असलेल्या देखभालीसाठीची योजना.
- टप्प्यानुसार (आधी-दरम्यान-नंतर) जिओटॅग केलेली छायाचित्रे. (अधिक तपशील वर दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये जोडलेला आहे)
  - वृक्षारोपण कार्यक्रमापूर्वी (Size १ ते २ MB)
  - वृक्षारोपण कार्यक्रमादरम्यान (Size १ ते २ MB)
  - माझी वसुंधरा अभियान ५.० च्या शेवटच्या दोन महिन्यांत (Size १ ते २ MB)
  - *वरील सर्व छायाचित्रे त्याच ठिकाणाहून (अँगलमध्ये) क्लिक केले असावेत.*
- *'एक पेड मां के नाम' योजनेअंतर्गत स्थानिक स्वराज्य संस्था वृक्षारोपण करू शकतात.*
- *सादर केलेली कागदपत्रे वैध/सुवाच्य नसल्यास,या निर्देशकासाठी कोणतेही गुण दिले जाणार नाहीत.*
- *स्थानिक स्वराज्य संस्थेने भरलेली माहिती माझी वसुंधरा अभियान १.०, २.०, ३.०, ४.० दरम्यान MIS मध्ये भरलेल्या माहितीशी जुळत नसल्यास, कोणतेही गुण दिले जाणार नाहीत. **(केवळ अपकीपसाठी लागू)***



SDG १५: जमिनीवरील जीवन

१५.२ : सर्व प्रकारच्या जंगलांच्या शाश्वत व्यवस्थापनाच्या अंमलबजावणीला चालना देणे, जंगलतोड थांबवणे , खराब झालेली जंगले पुनर्संचयित करून जागतिक स्तरावर वनीकरण आणि पुनर्वनीकरणात लक्षणीय वाढ करणे.

१५.५ : नैसर्गिक अधिवासांचा ऱ्हास कमी करण्यासाठी, जैवविविधतेचे नुकसान थांबवण्यासाठी आणि धोक्यात आलेल्या प्रजातींचे संरक्षण आणि विलुप्त होण्यापासून रोखण्यासाठी तातडीने आणि महत्त्वपूर्ण

स्थानिक प्रजातींच्या वृक्षांची सूचक यादी



दक्षिण उष्णकटिबंधीय निम-सदाहरित वने

१. टर्मिनलिया पॅनिक्युलाटा (किंजल)
२. मेमोसायलॉन अंबेलेटम (अंजनी)
३. टर्मिनलिया चेबुला (हिरडा)
४. सिझिजियम क्युमीनी (जांभूळ)
५. ओलिया डायोसिया (परजामुन)
६. मॅंगीफेरा इंडिका (आंबा)
७. ऍक्टिनोडाफ्ने हुकेरी (पिसा)



दक्षिण उष्णकटिबंधीय ओलसर पर्णपाती वने

१. टेक्टोना ग्रँडिस (सागवान)
२. टर्मिनलिया टोमेंटोसा (ऐन)
३. डेलबर्गिया लॅटिफोलिया (शिशम)
४. आदिना कार्डिफोलिया (हळदू)
५. मधुका इंडिका (मोहा)
६. टेरोकार्पसमार्सुपियम (बिजा)
७. मित्राज्ञा परविफ्लोरा (कलाम)
८. सालमालिया मालाबारिकम (सेमल)



दक्षिणी उष्णकटिबंधी काटेरी वने

१. अकेशिया अरेबिका (बाबुल)
२. अकेशिया ल्युकोफ्लेका (हिवर)
३. झिझिफस जुजुबा (बोर)
४. बुटीया मोनोस्पर्ना (पलास)
५. बेलानिट्स रेक्सबर्गी (हिंगणबेट)

टीप:ही यादी संपूर्ण नाही, वरील माहिती ही फक्त संदर्भासाठी आहे. अधिक नावे Untitled-2 (mahaforest.gov.in) या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

१.१.१ माझी वसुंधरा अभियानादरम्यान लावलेली आणि जगवलेली एकूण झाडे

MIS साठी आवश्यक तपशील

मूल्यमापन कार्यपद्धती क्रमांक	MIS साठी आवश्यक तपशील	सूचना / मार्गदर्शक
१	माझी वसुंधरा अभियान ५.० दरम्यान लागवड केलेल्या एकूण झाडांची संख्या.	माझी वसुंधरा अभियान ५.० दरम्यान लागवड केलेल्या एकूण झाडांची संख्या नमूद करा.
	माझी वसुंधरा अभियान ५.० दरम्यान जगवलेल्या एकूण झाडांची संख्या	माझी वसुंधरा अभियान ५.० दरम्यान जगवलेल्या एकूण झाडांची संख्या नमूद करा.
२	माझी वसुंधरा अभियान ५.० दरम्यान लागवड केलेल्या एकूण स्थानिक झाडांची संख्या.	माझी वसुंधरा अभियान ५.० दरम्यान लागवड केलेल्या एकूण स्थानिक झाडांची संख्या नमूद करा.
	माझी वसुंधरा अभियान ५.० दरम्यान जगवलेल्या एकूण स्थानिक झाडांची संख्या.	माझी वसुंधरा अभियान ५.० दरम्यान जगवलेल्या एकूण स्थानिक झाडांची संख्या नमूद करा.
१ आणि २	माझी वसुंधरा अभियान ५.० दरम्यान वृक्ष लागवडीखाली समाविष्ट असलेले एकूण क्षेत्र चौरस मीटर मध्ये	माझी वसुंधरा अभियान ५.० दरम्यान वृक्ष लागवडीखाली समाविष्ट असलेले एकूण क्षेत्र चौरस मीटर मध्ये क्षेत्रफळ नमूद करा.
	माझी वसुंधरा अभियान ५.० दरम्यान रस्त्याच्या कडेला लागवडीची एकूण लांबी मीटरमध्ये	माझी वसुंधरा अभियान ५.० दरम्यानरस्त्याच्या कडेला वृक्ष लागवडीखाली समाविष्ट केलेल्या क्षेत्राची एकूण लांबी (मीटरमध्ये) नमूद करा.
	वृक्षारोपणाची विविध टप्प्यांवरील जिओटॅग केलेली छायाचित्रे	१) टूलकिटमध्ये दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार जिओटॅग केलेल्या छायाचित्रांची संकलित पीडीएफ अपलोड करा. २) जिओ टॅगिंगमध्ये योग्य अक्षांश व रेखांश असावेत. ३) जिओ टॅग केलेल्या छायाचित्रांमध्ये तारीख आणि वेळ देखील नमूद असावी. ४) कोणतीही ब्लॅक अँड व्हाइट किंवा अस्पष्ट छायाचित्रे अपलोड करू नयेत.
	वृक्षारोपण उपक्रमाचा कार्यारंभ आदेश आणि कार्यापूर्णत्व प्रमाणपत्र	वृक्षारोपण उपक्रमांचे सर्व कार्यारंभ आदेशांची आणि कार्यापूर्णत्व प्प्रमानपत्रांची संकलित पीडीएफ अपलोड करा.
	देखभाल योजना अहवाल	माझी वसुंधरा अभियान ५.० दरम्यान तयार करण्यात आलेल्या वृक्षारोपणाच्या स्थळांसाठी पुढील १-२ वर्षांसाठी देखभाल योजना अहवाल अपलोड करा.
	वृक्षारोपण उपक्रमाचा आर्थिक अहवाल	आर्थिक पावत्या, प्रकल्पाची किंमत आणि उपयोगिता प्रमाणपत्र यांची संकलित पीडीएफ अपलोड करा. जर सदर कार्य CSR अंतर्गत केले गेले असतील तर पोचपावती /सामंजस्य करार (MOU) अपलोड करा.
	वृक्षारोपणाची सविस्तर माहिती	विहित केलेल्या एक्सेलमध्ये वृक्ष लागवडीचे तपशील अपलोड करा.
३	माझी वसुंधरा अभियान १.० मध्ये जगवलेली एकूण झाडे	माझी वसुंधरा अभियान १.० दरम्यान जगवलेल्या एकूण झाडांची संख्या नमूद करा.
	माझी वसुंधरा अभियान २.० मध्ये जगवलेली एकूण झाडे	माझी वसुंधरा अभियान २.० दरम्यान जगवलेल्या एकूण झाडांची संख्या नमूद करा.
	माझी वसुंधरा अभियान ३.० मध्ये जगवलेली एकूण झाडे	माझी वसुंधरा अभियान ३.० दरम्यान जगवलेल्या एकूण झाडांची संख्या नमूद करा.
	माझी वसुंधरा अभियान ४.० मध्ये जगवलेली एकूण झाडे	माझी वसुंधरा अभियान ४.० दरम्यान जगवलेल्या एकूण झाडांची संख्या नमूद करा.

टीप: MIS मध्ये भरावयाची माहिती फक्त इंग्रजी भाषेत असावी

१.१.१ माझी वसुंधरा अभियानादरम्यान लावलेली आणि जगवलेली एकूण झाडे

विहित केलेल्या एक्सेलमध्ये भरावयाचे तपशील

Sr No	Address of the tree plantation done during Majhi Vasundhara Abhiyan 5.0 (Local Body should only enter alphanumerical values)	Google map location of the tree plantation (Local Body should enter valid google map link)	Date of Tree Plantation during Majhi Vasundhara Abhiyan 5.0 (Local Body should only enter date in DD-MM-YY format)
1	2	3	4

Total number of trees planted at the given location during Majhi Vasundhara Abhiyan 5.0 (Local Body should only enter whole numbers)	Total number of trees survived at the given location during Majhi Vasundhara Abhiyan 5.0 (Local Body should only enter whole numbers)	Total number of Indigenous trees planted during Majhi Vasundhara Abhiyan 5.0 (Local Body should only enter whole numbers)	Total number of Indigenous trees survived at the given location during Majhi Vasundhara Abhiyan 5.0 (Local Body should only enter whole numbers)
5	6	7	8

Name of species of Indigenous trees planted during Majhi Vasundhara Abhiyan 5.0 (All indigenous species planted in that area should be mentioned here. For example- Mango, Banana, etc.) (Local body should enter text only)	If a plantation is done on the plots, please enter the area of the plot in square meters otherwise enter "0" (Local Body can also enter decimal values)	If plantation is done along the roads, please enter the length of the roadside plantation in meters otherwise enter "0" (Local Body can also enter decimal values)	Plantation by State Government Program/ Central Government Program/CSR/Community Participation/via Institutes/etc. (Local Body should choose appropriate option from the dropdown)
9	10	11	12

Date of work order of the tree plantation activity. (Local Body should only enter date in DD-MM-YY format)	Work order number of the plantation activity	Financial Brief for the tree plantation activities in "Rs"	Financial Receipt number for the Tree Plantation/If Plantation is done via CSR, then copy of acknowledgment slip
13	14	15	16

टीप: एक्सेलमध्ये भरावयाची माहिती फक्त इंग्रजी भाषेत असावी

१.१.१ माझी वसुंधरा अभियानादरम्यान लावलेली आणि जगवलेली एकूण झाडे





सदर छायाचित्रे केवळ उदाहरणादाखल दिलेली आहेत.

१.१.२ जिओटॅगिंगसह वृक्षगणना- तयारी आणि प्रकाशन

गुण १२५

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) वृक्ष संरक्षण व जतन अधिनियम १९७५, प्रकरण ४, कलम ७ (ब), मध्ये "डिसेंबर १९९६ पूर्वी एकदा आणि त्यानंतर दर पाच वर्षांनी एकदा, स्थानिक स्वराज्य संस्थेच्या अधिकार क्षेत्रातील सर्व जमीनीवरील अस्तित्वात असलेल्या सर्व वृक्षांची वृक्षगणना करणे अनिवार्य आहे." जुलै २०२१ मध्ये पुरातन वृक्षांची संकल्पना मांडण्यासाठी आणि "GIS आधारित वृक्षगणना किंवा इतर कोणत्याही आधुनिक तंत्रज्ञानासारख्या नवीन तांत्रिक माध्यमांचा वापर करून" दर पाच वर्षांनी वृक्षगणना अनिवार्य करण्यासाठी या कायद्यात सुधारणा करण्यात आली. वृक्षगणना वृक्ष आच्छादन आणि प्रजातींच्या विविधतेसाठी आधाररेखा प्रदान करते. माहितीचा उपयोग वृक्षांच्या देखभालीसाठी आणि संवर्धनाशी संबंधित विविध उपक्रमांसाठी उपाययोजना आणि विकास करण्याससाठी केला जाऊ शकतो.

मूल्यमापन कार्यपद्धती			गुण
१.	माझी वसुंधरा अभियान ५.० पूर्वी वृक्षगणना अहवाल तयार आणि प्रकाशित केलेला आहे का? (जिओटॅगिंगसह)		७५
	होय	५०	
	नाही	०	
१ (अ)	होय असल्यास, माझी वसुंधरा अभियान ५.० दरम्यान वृक्ष गणना अहवाल अद्ययावत आणि प्रकाशित केला आहे का? (जिओटॅगिंगसह)		
	होय	२५	
	नाही	०	
१ (ब)	नाही असल्यास, माझी वसुंधरा अभियान ५.० दरम्यान अहवालाची स्थिती		
	जिओटॅगिंगसह वृक्ष गणना – अहवाल १००% तयार व प्रकाशित	७५	
	जिओटॅगिंगसह वृक्ष गणना – अहवाल ५०% तयार व प्रकाशित	३०	
	जिओटॅगिंगसह वृक्ष गणना – अहवाल ५०% हून कमी तयार व प्रकाशित	०	
२.	पुरातन वृक्षांची यादी – अद्ययावत आणि प्रकाशित		२५
३.	पुरातन वृक्षांचा संरक्षण आराखडा		२५
	होय	२५	
	नाही	०	

आवश्यक तपशील:

- स्थानिक संस्थेच्या संकेतस्थळावर, स्थानिक वृक्ष प्राधिकरणाने अधिकृत केलेल्या वृक्षगणना अहवालाची लिंक- जिओटॅगिंगसह (पुरातन वृक्षगणना अहवालासह)
- वृक्षगणना अहवाल आणि जिओटॅगिंगसह पुरातन वृक्षांची अद्ययावत यादी – ही यादी ULB च्या अधिकृत संकेतस्थळावर प्रकाशित केली तरच स्वीकारली जाईल.
- रितसर शिक्का मारलेली वृक्षगणना अहवालाची प्रत.
- पुरातन वृक्षांचा संरक्षण आराखडा
- स्थानिक वृक्ष प्राधिकरणाकडून जिओटॅगिंगसह वृक्षगणना अहवालाची स्थिती दर्शवणारी हमीपत्राची प्रत.
- पुरातन वृक्षांसह सर्व वृक्षांचे जिओटॅगिंग करणे अनिवार्य आहे. जिओटॅगिंग न केल्यास कोणतेही गुण दिले जाणार नाहीत.

टीप : अहवाल १००% तयार आणि प्रकाशित– स्थानिक स्वराज्य संस्थेच्या १००% क्षेत्रफळाचा समावेश

अहवाल ५०% तयार आणि प्रकाशित– स्थानिक स्वराज्य संस्थेच्या ५०% क्षेत्रफळाचा समावेश

- सादर केलेली कागदपत्रे वैध/ सुवाच्य नसल्यास,या निर्देशकासाठी कोणतेही गुण दिले जाणार नाहीत.



SDG १५: जमिनीवरील जीवन

१५.२ : सर्व प्रकारच्या जंगलांच्या शाश्वत व्यवस्थापनाच्या अंमलबजावणीला चालना देणे, जंगलतोड थांबवणे , खराब झालेली जंगले पुनर्संचयित करून जागतिक स्तरावर वनीकरण आणि पुनर्वनीकरणात लक्षणीय वाढ करणे.

१५.५ : नैसर्गिक अधिवासांचा ऱ्हास कमी करण्यासाठी, जैवविविधतेचे नुकसान थांबवण्यासाठी आणि धोक्यात आलेल्या प्रजातींचे संरक्षण आणि विलुप्त होण्यापासून रोखण्यासाठी तातडीने आणि महत्त्वपूर्ण

१.१.२ जिओटॅगिंगसह वृक्षगणना- तयारी आणि प्रकाशन

MIS साठी आवश्यक तपशील

मूल्यमापन कार्यपद्धती क्रमांक	MIS साठी आवश्यक तपशील	सूचना / मार्गदर्शक
१	माझी वसुंधरा अभियान ५.० पूर्वी जिओटॅगिंगसह वृक्षगणना अहवाल तयार करून स्थानिक स्वराज्य संस्थेच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रकाशित करण्यात आला आहे का?	ड्रॉपडाउन मधून होय किंवा नाही हा पर्याय निवडा माझी वसुंधरा अभियान ५.० च्या आधी वृक्षगणना अहवाल तयार केला आणि प्रकाशित केला असल्यास "होय" निवडा अन्यथा "नाही" निवडा.
१(अ)	माझी वसुंधरा अभियान ५.० दरम्यान जिओटॅगिंगसह वृक्षगणना अहवाल अद्ययावत आणि प्रकाशित झाला आहे का?	ड्रॉपडाउन मधून होय किंवा नाही हा पर्याय निवडा माझी वसुंधरा अभियान ५.० दरम्यान जिओटॅगिंगसह वृक्षगणना अद्ययावत आणि प्रकाशित झाल्यास "होय" निवडा.
	स्थानिक स्वराज्य संस्थेच्या अधिकृत संकेतस्थळावर अपलोड केलेल्या वृक्षगणना अहवालाची लिंक	वृक्षगणना अहवाल असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या अधिकृत संकेतस्थळाची वैध लिंक अपलोड करा.
	माझी वसुंधरा अभियान ५.० दरम्यान अद्ययावत वृक्षगणना अहवाल तयार करून प्रकाशित केला.	माझी वसुंधरा अभियान ५.० दरम्यान तयार केलेला आणि प्रकाशित केलेला अद्ययावत वृक्षगणना अहवाल अपलोड करा.
१(ब)	माझी वसुंधरा अभियान ५.० दरम्यान वृक्षगणनेच्या जिओटॅगिंगसह अहवाल तयार करण्याची स्थिती	ड्रॉपडाउन पर्यायांमधून निवडा१.जिओटॅगिंगसह वृक्षगणना - १००% अहवाल तयार आणि प्रकाशित २.जिओटॅगिंगसह वृक्षगणना -५०% अहवाल तयार आणि प्रकाशित ३.जिओटॅगिंगसह वृक्षगणना -५०% पेक्षा कमी अहवाल तयार आणि प्रकाशित
	वृक्षगणना अहवाल	माझी वसुंधरा अभियान ५.० दरम्यान तयार केलेला आणि प्रकाशित केलेला वृक्षगणना अहवाल अपलोड करा.
२	स्थानिक स्वराज्य संस्थेने पुरातन वृक्षांची (हेरिटेज ट्री) यादी तयार करून प्रकाशित केली आहे का?	ड्रॉपडाउन मधून होय किंवा नाही हा पर्याय निवडा.जर तुम्ही पुरातन वृक्षांची (हेरिटेज ट्री) यादी तयार करून प्रकाशित केली असेल तर "होय" निवडा, अन्यथा "नाही" निवडा.
	पुरातन वृक्षांची (हेरिटेज ट्री) वृक्षगणना अहवाल अपलोड असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या अधिकृत संकेतस्थानाची वैध लिंक	पुरातन वृक्षांची (हेरिटेज ट्री) वृक्षगणना अहवाल अपलोड असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या अधिकृत संकेतस्थानाची वैध लिंक अपलोड करा.
	जिओटॅग केलेल्या पुरातन वृक्षांची (हेरिटेज ट्री) तयार आणि प्रकाशित केलेली यादी	जिओटॅग केलेल्या पुरातन वृक्षांची (हेरिटेज ट्री) यादी संकलित पीडीएफ स्वरूपात अपलोड करा.
३	स्थानिक स्वराज्य संस्थेने पुरातन वृक्षांसाठी (हेरिटेज ट्री) देखभाल योजना अहवाल तयार करून प्रकाशित केला आहे का?	ड्रॉपडाउन मधून होय किंवा नाही हा पर्याय निवडा.जर तुम्ही पुरातन वृक्षांसाठी (हेरिटेज ट्री) देखभाल योजना अहवाल तयार करून प्रकाशित केला असेल तर "होय" निवडा, अन्यथा "नाही" निवडा.
	वृक्ष देखभाल योजना अहवाल	माझी वसुंधरा अभियान ५.० दरम्यान तयार केलेला आणि प्रकाशित केलेला वृक्ष देखभाल योजना अहवाल अपलोड करा.

१.१.२ जिओटॅगिंगसह वृक्षगणना- तयारी आणि प्रकाशन

विहित केलेल्या एक्सेलमध्ये भरावयाचे तपशील

Information required	Details	Guidance/Instructions
Total Area of the local body		Enter total area of the local body in sq.km. Can enter decimal numbers.
Is tree census report prepared and published		Select from the dropdown options: 1. Yes 2. No
Number of trees in the local body		Enter number of trees in the local body. Enter only whole numbers.
Number of geotagged trees in the local body		Enter number of geotagged trees in the local body. Enter only whole numbers.
Percentage of geotagged trees in the local body		This will be auto calculated.

टीप: एक्सेलमध्ये भरावयाची माहिती फक्त इंग्रजी भाषेत असावी

१.१.२ जिओटॅगिंगसह वृक्षगणना- तयारी आणि प्रकाशन









सदर छायाचित्रे केवळ उदाहरणादाखल दिलेली आहेत.

१.१.३ महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, १९७५ ची अंमलबजावणी

गुण १५०

महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण आणि जतन अधिनियम, १९७५ च्या जुलै २०२१ च्या सुधारणेत, शहरी भागात वृक्षतोड नियंत्रित करण्यासाठी, तोडल्या जाणाऱ्या झाडांच्या संचित (cumulative) वयानुसार पुरेशा प्रमाणात झाडे लावून वृक्षतोड नियंत्रित करण्यासाठी तरतूद केली आहे. हा निर्देशक महाराष्ट्रातील शहरी भागात या अधिनियमाची प्रभावीपणे अंमलबजावणी होते का याची तपासणी करतो.

मूल्यमापन कार्यपद्धती			गुण
१.	६० दिवस किंवा त्यापेक्षा कमी कालावधीत ना हरकत प्रमाणपत्र (NOC) दिलेल्या प्रकल्पांची टक्केवारी		५०
	१००% प्रकल्प	५०	
	१००% पेक्षा कमी प्रकल्प	०	
२.	स्थानिक स्वराज्य संस्थेने प्रदान केलेल्या ना हरकत प्रमाणपत्रानुसार (NOC) नुकसानभरपाई म्हणून केलेल्या लागवडीची टक्केवारी		५०
	१००%	५०	
	१००% पेक्षा कमी	०	
३.	नुकसान भरपाई म्हणून लागवड केलेल्या वृक्षांपैकी जगलेल्या वृक्षांची टक्केवारी		५०
	९५% पेक्षा अधिक	५०	
	७५% ते ९५%	१५	
	७५% पेक्षा कमी	०	

आवश्यक तपशील :

- १६ जुलै २०२१ ते ३१ मार्च २०२५ पर्यंत प्राप्त झालेल्या एकूण संख्येच्या प्रस्तावाच्या तपशिलांसह सारांश अहवाल – विहीत एक्सेल स्वरूपात
- वृक्ष/ नियोजन प्राधिकरणाने दिलेल्या ना हरकत प्रमाणपत्राची संकलित प्रत
- सक्षम प्राधिकाऱ्याद्वारे अधिकृत केलेली वार्षिक अनुपालन अहवालाची प्रत (annual compliance report)
- स्थानिक वृक्ष प्राधिकरण (LTA) आणि महाराष्ट्र राज्य वृक्ष प्राधिकरण (MSTA) यांद्वारे देण्यात आलेली ना हरकत प्रमाणपत्रे (NOC) मूल्यमापनासाठी विचारात घेतली जातील.
- सादर केलेली कागदपत्रे वैध/ सुवाच्य नसल्यास, या निर्देशकासाठी कोणतेही गुण दिले जाणार नाहीत.

$$\text{नुकसानभरपाई म्हणून केलेल्या वृक्ष लागवडीची टक्केवारी} = \frac{\text{लावलेल्या वृक्षांची संख्या}}{\text{ना हरकत प्रमाणपत्रानुसार तोडल्या जाणाऱ्या किंवा पुनर्रोपण करावयाच्या वृक्षांचे एकूण वय}} \times १००$$

$$\text{नुकसानभरपाई म्हणून केलेल्या वृक्ष लागवडी पैकी जगलेल्या वृक्षांची टक्केवारी} = \frac{\text{नुकसानभरपाई लागवडी मधल्या जगलेल्या वृक्षांची एकूण संख्या}}{\text{नुकसानभरपाई वृक्ष लागवडीची एकूण संख्या}} \times १००$$

SDG १५: जमिनीवरील जीवन



१५.५ : नैसर्गिक अधिवासांचा ऱ्हास
